## स्थायी समिति
## दाखल विषय – दि. २३/१०/२०१८

**विषय क्रमांक :– १४४२ त्वर्य**

प्रभाग क्र. ३२ वारजे गाव सर्व्हिस रस्ता ते स्मशानभूमी रस्त्यावरील म.रा.वि.वि.कंपनीच्या ओव्हरहेड एच.टी. व एल.टी. लाईन्स काढून भूमिगत केबल टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रीकल कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४५,४७,४८२/– पेक्षा ७.९९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,८३,६८३=८९ पर्यंत काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६१४ दि. २०/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १४४३ त्वर्य**

पी.एम.पी.एम.एल. संस्थेस सन २०१७–१८ या वर्षात मोफत / सवलतीचे बसपासपोटी खर्च केलेल्या रकमेपोटी सन २०१८–१९ या वर्षात आदा करावयाच्या रकमेतून उचल स्वरुपात र.रु.२१ कोटी अग्रीम आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/६२० दि.२२/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १४४४ त्वर्य**

मा.सौ.निलिमा खाडे व मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. २३/१०/२०१८ चे पत्र.

शिवाजीनगर,जुना तोफखाना मजिद येथील गल्ली क्र.२०५, भागवत गॅरेज पासून ते ८१/२ आशाबी बिल्डींग पर्यंतचा रस्ता खूपच अरूंद झालेला आहे. त्यामुळे त्याठिकाणी नागरिकांना येणे–जाणे खूपच त्रासदायक होत असल्यामुळे त्या ठिकाणी रस्ता रूंदी होणे आहे.

तरी सदर ठिकाणी कलम २१० अन्वये रस्ता रूंदी करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १४४५ त्वर्य**

प्रभाग क्र. ५७ ब मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालयाची धोकादायक झालेली इमारत दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मंगलमुर्ती डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७०,३८,८१८=०८ पेक्षा २८.२३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५०,५१,७५९=७३ रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन /६२१ दि. २२/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १४४६ त्वर्य**

मा. स्थायी समिती ठराव क्र. २३६१ दि.०९/०२/२०१६ चे अधिन राहुन पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी DOOR TO DOOR SEGREGATED GARBAGAE COLLECTION BY PRIMARY AND SECONDARY TRANSPORTATION BY 7 TON GVW AND 1.5 TON GVW CAPACITY BELL TIPPER/TRUCK & TRANSPORTATION TO TRANSFER STATIONS, SWM PROJECT WITH OPERATION & MAINTENANCE OF PMC'S OWN AND CONTRACTORS VEHICLES For 3+2 YEARS हे काम मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून गत ३ वर्षामधील कामकाज समाधानकारक असल्याने पुढील चौथ्या व पाचव्या या दोन वर्षाकरीता मान्य दरानुसार पुणे मनपा मोटार वाहन विभागाकडून पुरविण्यात आलेल्या वाहनांकरीता तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या मागणीनुसार ठेकेदाराकडून घेण्यात येणाऱ्या वाहनांकरीता चौथ्या वर्षाकरीता रक्कम रु.२२.५० कोटी व पाचव्या वर्षाकरीता रक्कम रु. २२.५० कोटी याप्रमाणे अगर प्रत्यक्ष कामापोटी होणाऱ्या रक्कमेपर्यंत घरोघरी जाऊन कचरा संकलन करणेचे काम करुन घेणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/६२७ दि.२३/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १४४७ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्या अखत्यारीत असलेले पंडित नेहरू स्टेडीयम हे क्रिकेट सामन्याकरीता, क्रिकेट प्रशिक्षणाकरीता मागणीनुसार विविध क्रीडा संस्थाना भाड्याने उपलब्ध करून दिले जाते. सदरचे भाडे रोख किंवा धनादेशाद्वारे स्वीकारण्यात येते.

१) समीर पवनी / फोर पिलर्स इव्हेन्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. (कल्लाकार फॅक्टरी) बी–३०२, उज्वल सेरेन,स.नं. २७३/१ माउली गार्डनजवळ, बाणेर रोड, पुणे –४५ यांच्या दि. १०/१०/१७ रोजीच्या मागणी अर्जाद्वारे दि.१० ते १२ नोव्हेंबर

२०१७ रोजी तीन दिवस मैदानाच्या आरक्षणाची मागणी केली होती. मा. स्थायी समिती ठराव क्र. ४३, दिनांक १२.०४.२०१६ नुसार त्यांचेकडून भाडे रक्कम रूपये १,६८,०००/- श्री. समीर पवनी यांचे धनादेशाद्वारे (stanadard charted bank) शाखा कल्याणीनगर, पुणे, चेक क्रमांक ०००२०४ दि. ८/११/२०१७ अन्वये क्रीडा विभागाकडे देण्यात आला होता. सदरील धनादेश स्वीकारून त्यांना मैदान उपलब्ध करून देण्यात आले असून सदर तारखांना श्री. समीर पवनी तर्फे फोर पिलर्स इव्हेन्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. (कल्लाकार फॅक्टरी) यांनी मैदानाचा वापर केला आहे. श्री. समीर पवनी तर्फे फोर पिलर्स इव्हेन्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी अनामत रक्कम म्हणून रक्कम रू.१,००,०००/- (एक लाख फक्त) चेक क्रमांक ००००१३ दिनांक ११.०५.२०१७ (standard charted bank) शाखा कल्याणीनगर पुणे रक्कम रू. ५०,०००/-( अनामत चलन क्र. १५७८८ दिनांक ११.०५.२०१८ व चेक क्रमांक ००००३४ दिनांक २५.०५.२०१८ (stanadard charted bank) शाखा कल्याणीनगर, पुणे रक्कम रू.५०,०००/- ( अनामत चलन क्र. १५७८९ दिनांक २६.०५.२०१८) असे क्रीडा विभागाकडे जमा केलेले आहेत.

२) ॲड. समीर ए. तांबोळी यांच्या दि. ११/१०/२०१७ रोजीच्या मैदनाच्या आरक्षणाची मागणी अर्जाद्वारे दिनांक २२ व २५ नोव्हेंबर एकूण दोन दिवस मागणी केली होती. मा. स्थायी समिती ठराव क्र. ४३ दिनांक १२.०४.२०१६ नुसार त्यांचेकडून भाडे रक्कम रूपये ५०,४००/- धनादेशाद्वारे (HDFC Bank) शाखा कल्याणीनगर पुणे, चेक क्र. ००००१२ दि. ०७/११/२०१७ अन्वये क्रीडा विभागाकडे जमा करण्यात आली होती.

सदरील धनादेश स्वीकारून त्यांना मैदान उपलब्ध करून देण्यात आले असून ॲड. समीर ए. तांबोळी यांनी सदर तारखांना मैदानाचा वापर केला आहे.

ॲड. समीर ए. तांबोळी व श्री.समीर पवनी तर्फे फोर पिलर्स इव्हेन्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. यांचे बँकेतील अपूर्ण निधीमुळे सदरील धनादेश न वटल्याने बँकेकडून दि. २२.११.२०१७ व दि.३०.११.२०१७ रोजी मा. उपलेखापाल, (कोष) यांचेकडे परत आलेले आहेत. याबाबत उपलेखापाल (कोष) कार्यालयाने क्रीडा विभागास कळविले आहे. संबंधितांशी वेळोवेळी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता भाडे रक्कम अदा करणेबाबत योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे क्रीडा विभागाकडील जावक क्र. ९४ दिनांक ०९.०५.२०१८ अन्वये ॲड समीर ए. तांबोळी व जावक क्र. ९३ दिनांक ०९.०५.२०१८ अन्वये श्री. समीर पवनी तर्फे फोर पिलर्स इव्हेन्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. यांना नोटिस बजावली आहे. त्यास अनुसरून ॲड. समीर ए. तांबोळी यांनी दि.२५/११/२०१७ या एक दिवसाचे भाडे चेक क्र. ००००२५ दि.१६/५/२०१८ कोटक बँक र.रुपये ३३,६००/- चलन क्र. ६५९१२ दि.२५/५/२०१८ ने जमा केले आहे. उर्वरित रक्कम रु. १६,८००/- ॲड्. समीर ए. तांबोळी यांचेकडून येणे असल्याने त्यांना क्रीडा विभागाकडील जा.क्र. २५५ दिनांक १८.०६.२०१८ ने रक्कम भरणेबाबत कळविले आहे.

ॲड. समीर ए. तांबोळी व श्री. समीर पवनी तर्फे फोर पिलर्स इव्हेन्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि. यांना थकीत भाडे रक्कम भरणेबाबत वारंवार कळविले असून तसेच दूरध्वनीद्वारे त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांचेकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे संबधीतांवर कारवाई करणेबाबत क्रीडा विभागाने मा. विधी अधिकारी यांचा अभिप्राय मागविला असता ''दिवाणी प्रकियेनुसार ॲड समीर ए. तांबोळी व श्री. समीर पवनी तर्फे फोर पिलर्स इव्हेन्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. यांचे विरोधात रक्कम वसुलीकामी दावा दाखल करणे शक्य आहे. ''असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी वरील दोन्ही धनादेश न वटल्यामुळे पुणे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिकेची आर्थिक फसवणूक झाली असल्याने संबंधितांवर दिवाणी दावा दाखल करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/क्रीवि/४२२,दि.२७/०८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.विधी समिती ठराव क्र. १२ दि.२६/९/२०१८ विचारासाठी.

**विषय क्रमांक :– १४४८ त्वर्य**

मा.सौ.हमीदा सुंडके यांचे दि. १९/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२७ क, मध्ये स.नं.४२ व विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रिटीकरण करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, ७. आरोग्य विभाग, पान क्र. १००, अ.क्र. ६, शहरातील विविध स्मशानभूमी/दफनभूमी, दशक्रिया विधी, घाट बांधणे व विविध विकासकामे करणे (यादी क्र. एसजे १२), पान क्र.२४५, अ.क्र.६३, प्रभाग क्र.२७ क, मध्ये नुराणी कब्रस्तानच्या भिंती रंगविणे | १० लाख | -- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| प्रभाग क्र.२७ क, मध्ये स.नं.४२ व विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रिटीकरण करणे | -- | १० लाख |

**विषय क्रमांक :– १४४९ त्वर्य**

मा.धनराज घोगरे यांचे दि. २०/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२५ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र.२७५, अ.क्र.१२१, प्रभाग क्र.२५ अ कोंढवा खुर्द स.न. ४ येथे विकास आराखड्यानुसार आरक्षीत जागेवर उद्यान विकासीत करणे | ३० लाख | -- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र.२५ अ मध्ये ई लायब्ररी करीत संगणक पुरवणे | -- | २० लाख |
| २) प्रभाग क्र.२५ अ मध्ये विविध ठिकाणी व्यायामाचे साहित्य पुरविणे | -- | १० लाख |

**विषय क्रमांक :- १४५० त्वर्य**

मा.सौ.शितल सावंत यांचे दि. २०/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२ क मध्ये व्यायाम साहित्य पुरविणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १२, शहरातील रस्ते कॉंक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र.१९२, अ.क्र.६०, प्रभाग क्र.२ क राजीव गांधीनगर ट्रिमिक्स रस्ता व गल्लीबोळ कॉंक्रिटी करणे | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र.२ क मध्ये व्यायाम साहित्य पुरविणे | -- | १० लाख |

**विषय क्रमांक :- १४५१ त्वर्य**

मा.राजेश येनपुरे व मा.हेमंत रासने यांचे दि. २०/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१५ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १०४, अ.क्र. २, शहरातील वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसटी २), १)पान क्र.२१५, अ.क्र.६२, प्रभाग क्र.१५ ड मधील हमालवाडा वाहनतळास अल्युमिनियम कंपोझिट पॅनेलिंग करणे | १० लाख | -- |
| २) पान क्र.२१५,अ.क्र.६१, प्रभाग क्र.१५ ड मधील हरिभाऊ साने वाहनतळास अल्युमिनियम कंपोझिट पॅनेलिंग करणे. | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र.१५ ड मध्ये हमालवाडा(शिवाजीराव आढाव वाहनतळ) येथे महिला व पुरषांसाठी शौचालय बांधणे. | -- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.१५ ड मध्ये विविध ठिकाणी नागरीकांना बसण्यासाठी बेंचेस पुरविणे | -- | १० लाख |

**विषय क्रमांक :- १४५२ त्वर्य**

मा.राजेश येनपुरे व मा.हेमंत रासने यांचे दि. २०/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१५ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २६, अ.क्र. २, शहरामध्ये पाण्याच्या लाईन टाकणे, (यादी क्र. एसपी २), १)पान क्र.३७, अ.क्र.१२८, प्रभाग क्र.१५ ड मधील शनिवार पेठ परिसरामध्ये व प्रभागात इतरत्र पाण्याची लाईन टाकणे व तदनुषंगीक कामे करणे. | १० लाख | -- |
| २) पान क्र.३७, अ.क्र.१२९, प्रभाग क्र.१५ ड मधील नारायण पेठ परिसरामध्ये व प्रभागात इतरत्र पाण्याची लाईन टाकणे व तदनुषंगीक कामे करणे. | १० लाख | -- |

| नविन सुचविलेली कामे | | |
|---|---|---|
| १) प्रभाग क्र.१५ ड मधील शनिवार पेठ, बुधवार पेठ, नारायण पेठ व प्रभागात इतर ड्रेनेज लाईन टाकणे व त्यावर कॉंक्रिट करणे. | -- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.१५ ड मधील सदाशिव पेठ, शुक्रवार पेठ व प्रभागात इतर ड्रेनेज लाईन टाकणे व त्यावर कॉंक्रिट करणे | -- | १० लाख |

**विषय क्रमांक :- १४५३ त्वर्य**

मा.सौ.निता दांगट (पा.) यांचे दि. २०/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.३३ बारांगणी मळा विहीर ते महादेव मंदिर(धायरी) टाकी पर्यंत एम.एस.लाईन टाकणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, ९.पथांची झाडलोट, कचरा व मैलापाणी वाहतुक व्यवस्था, क.पथांची झाडलोट, पान क्र. ६३, घनकचरा संदर्भात करावयाची स्वच्छता व देखभाल दुरुस्ती कामे करणे, (यादी एसआर-११),<br>१)पान क्र.१५२, अ.क्र.३२, प्रभाग क्र.३३ क मधील वडगाव परिसरात झाडण काम करणे | १० लाख | -- |
| २) पान क्र.१५२, अ.क्र.३३, प्रभाग क्र.३३ क मधील धायरी परिसरात झाडण काम करणे | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र.३३ बारांगणी मळा विहीर ते महादेव मंदिर(धायरी) टाकी पर्यंत एम.एस.लाईन टाकणे | -- | २० लाख |

**विषय क्रमांक :- १४५४ त्वर्य**

मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. २०/१०/२०१८ चे पत्र.

सन २०१८-१९ चे अंदाज पत्रकामधील पथ विभागातील अर्थ शीर्षकावर सुस ते पाषाण यांना जोडणारा स.नं.१३४,१३५,१३६,१३७,१३८ व १४० पाषाण या मिळकतीमधून जाणा-या ३६ मीटर डी.पी रस्त्याचे भूसंपादनाकरिता रु.२७३ लक्ष उपलब्ध आहेत.

अर्थशीर्षक क्रं. CE20A102/A2-104 या रस्त्याची सुमारे १२०० मीटर लांबी पैकी ६०० मीटर लांबीचा रस्ता विकसित झालेला असून उर्वरित ६०० मीटर रस्त्याच्या बाधित मिळकतीचा ताबा तडजोडीने घेण्याबाबतची कार्यवाही बांधकाम विकास विभाग व मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडून सुरु आहे. या रस्त्याची भूसंपादनाकरिता उपलब्ध असलेली रक्कम याच रस्त्याच्या विकासनाकरिता उपलब्ध करुन दिल्यास रस्ता विकसनाचे काम पूर्ण होऊ शकेल. तरी खालील र.रुपये २७३ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरण करणे, (ए-२), पान क्र.१६०, अ.क्र.४, CE20A102/A2-104, सुस ते पाषाण यांना जोडणारा स.नं.१३४,१३५,१३६,१३७, १३८ व १४० पाषाण या मिळकतीमधून जाणा-या ३६ मीटर डी.पी रस्त्याचे डांबरीकरण/कॉंक्रीटीकरण करणे (भूसंपादनासाठी) | २७३ लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>१०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरण करणे, (ए-२), पान क्र.१६०, अ.क्र.१२, CE20A102/SA2-296, सुस ते पाषाण यांना जोडणारा स.नं.१३४,१३५,१३६,१३७,१३८ व १४० पाषाण या मिळकतीमधून जाणा-या ३६ मीटर डी.पी रस्त्याचे डांबरीकरण/कॉंक्रीटीकरण करणे | --- | २७३ लाख |

**विषय क्रमांक :- १४५५ त्वर्य**

मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. २२/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.७ ब जनवाडी गोखलेनगर व विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. ५, शहरात विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एसए १०), पान क्र.१८४, अ.क्र.२६, प्रभाग क्र. ७ ब मध्ये संगमवाडी ओंकार गणेश मंदिरा समोरील रोड बाजूला फरशी बसविणे | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र.७ ब जनवाडी गोखलेनगर व विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणे | -- | १० लाख |

**विषय क्रमांक :- १४५६ त्वर्य**

मा.सौ.सोनाली लांडगे यांचे दि. २२/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ७ अ मधील नागरिकांसाठी व महिलांसाठी विविध ठिकाणी आरोग्य तपासण्या व आरोग्य शिबीर करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. ११०, अ.क्र. ७, शहरामध्ये विविध ठिकाणी सिमाभिंत बांधणे, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२४८, अ.क्र.६५, प्रभाग क्र. ७ अ मध्ये एम.आय.जी. व एल.आय.जी. परिसरात सिमाभिंत बांधणे | १० लाख | --- |
| २) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरण करणे, (यादी क्र. एसए २), पान क्र.१६३, अ.क्र.१३२, प्रभाग क्र. ७ अ मध्ये गोखलेनगर येथे रस्ता सिमेंट कॉंक्रीट किंवा डांबरीकरण करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ७ अ मधील नागरिकांसाठी व महिलांसाठी विविध ठिकाणी आरोग्य तपासण्या व आरोग्य शिबीर करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

**विषय क्रमांक :- १४५७ त्वर्य**

मा.दिलिप वेडेपाटील व मा.राजाभाऊ बराटे यांचे दि. २३/१०/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या व माध्यामिक शाळामधून शिक्षण घेणारे विद्यार्थी हे बहुतांशी गोरगरीब व अल्प उत्पन्न गटातील आहेत.त्यांना रोजच्या आहारातून पुरेशे व्हिटॅमिन न मिळाल्याने सातत्याने आजारी पडणे, अशक्तपणा वाटत राहुन त्याचा विपरीत परिणाम शाळेतील उपस्थितीवर देखील पडत असतो.

या मुलांना Sureboost Sachet उपलब्ध झाल्यास त्यांची रोग प्रतिक्रार शक्ती वाढण्यास मोलाची मदत होणार आहे. हे २ वर्षे व त्यावरील वयोगटातील विद्यार्थ्यांना देता येणे शक्य असून त्यामधील Content कॅरिका पपई अर्क,टिनसपोरा कॉर्डिफोलिया,बकरीचे दुध आणि व्हिटॅमिन ई. असे आहेत.

त्यामधील कॅरिका पपई व्हारयल इन्फेक्शनमध्ये प्लेटलेट्सची पातळी वाढवून ठेवण्यासाठी मदत करते.टिनोसपोरा यांना गुडुची म्हणून देखील ओळखले जाते जे प्रतिदिन विषाणुजन्य संसर्गने लढण्यासाठी प्रतिकार पातळी वाढवते. बकरीच्या दुध पावडरमध्ये जास्त प्रमाणात सेलेनियम असते. जे नैसर्गिक सुपर अँटिऑक्सिडेंट्स असते आणि व्हिटॅमिन ई देखील शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट्स असतात. अँटिऑक्सिडेंट्स फ्री रेडिकल्सची रोकथाम करण्यास मदत करते ज्यामुळे प्रतिकारशक्ती वाढते.

कमी पौष्टिक आहार असलेल्या विद्यार्थ्यांना व्हायरल इन्फेक्शन होते.त्यांना Sureboost मदत करते. अशा पोषण स्तरावर प्रतिरोधक पातळी वाढवण्यासाठी हे सॅचेट घेतल्याने त्यांची प्रतिकारशक्ती वाढविण्यात मदत होईल जी त्यांना आजारपण आणि हॉस्पीटलायझेशनचे मुख्य कारण या रोगाशी लढण्यात मदत करेल. Sureboost जीवन गुणवत्ता देखील वाढवते.

तरी या एका चा बहुगुणी उपयोग पाहता पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना वर्षातून दोन वेळेस (सहा महिन्यातुन एकदा) Sureboost Sachet शालेय पोषण आहारातून उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- १४५८ त्वर्य**

मा.किरण दगडे पाटील यांचे दि. २२/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १० अ, मधील डी.एस.के रानवारा परिसरामध्ये चौक सुशोभिकरण करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १२. भवने, भुमि व मनपा वसाहतीची व्यवस्था, पान क्र.११०, अ.क्र. ३६, शहरामध्ये समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका, विरंगुळा केंद्रे, ध्यानकेंद्रे महिला बचत गट हॉल/आधारकेंद्रे उभारणे (यादी क्र. एसजे २०), पान क्र.२५८, अ.क्र.४९, प्रभाग क्र. १० अ मध्ये कृष्णलीला गार्डन येथे समाज मंदिर बांधणे | २० लाख | -- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| प्रभाग क्र. १० अ, मधील डी.एस.के रानवारा परिसरामध्ये चौक सुशोभिकरण करणे | -- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १४५९ त्वर्य**

मा.श्रीमती स्मिता वस्ते यांचे दि. २२/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२९ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.३५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११४, अ.क्र.७, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम, क्रीडांगणे बांधणे, मैदाने विकसित करणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२६५, अ.क्र.६३, प्रभाग क्र २९ क पेशवे पार्क येथे गोकार्टिंग ट्रॅक उभारणे | २५ लाख | -- |
| २) १०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १०४, अ.क्र. २, शहरातील वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसटी २), पान क्र.२१६, अ.क्र.१०६, प्रभाग क्र २९ क पेशवे उद्यान येथील वाहनतळ बहुमजला बांधणे व विकासीत करणे | १० लाख | -- |
| **<u>नविन सुचविलेली कामे</u>** | | |
| १) प्रभाग क्र २९ क विविध ठिकाणी फरशी बसविणे.<br>२) प्रभाग क्र २९ क विविध ठिकाणी काँक्रिटीकरण करणे.<br>३) प्रभाग क्र २९ क विविध विकास कामे करणे.<br>४) प्रभाग क्र २९ क पर्वती दर्शन येथे विविध ठिकाणी फरशी बसविणे. | --<br>--<br>--<br>-- | १० लाख<br>१० लाख<br>१० लाख<br>५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १४६० त्वर्य**

मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. २२/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१९ क मध्ये विविध ठिकाणी फुटपाथ दुरुस्ती व विकसित करणेसाठी र.रु.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंडया व पशुवधगृहे, पान क्र. ११४, अ.क्र. ७, शहरामध्ये भाजी मंडई, ओटा मार्केट, मटन मार्केट बांधणे, भाजी मंडयामध्ये विकास कामे करणे (यादी एसजे २९), पान क्र.२६९, अ.क्र.१८, प्रभाग क्र.१९ क मधील मटन मार्केट येथील जुनी इमारत पाडून नविन इमारत बांधणे | १५ लाख | -- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| प्रभाग क्र.१९ क मध्ये विविध ठिकाणी फुटपाथ दुरुस्ती व विकसित करणे | -- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १४६१ त्वर्य**

मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता यांचे दि. २३/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २९ (स्विकृत) मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे, फरशी बसविणे, ब्लॉक, कॉंक्रीटीकरण करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. २, Pedestrian Policy नुसार शहरातील फुटपाथ विकसित करणे, (यादी क्र. एसए १३), पान क्र.१८०, अ.क्र.२०१, प्रभाग क्र. २८ ब मध्ये आदर्श सोसायटी येथील फुटपाथ विकसित करणे | २० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र. २९ (स्विकृत) मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे, फरशी बसविणे, ब्लॉक, कॉंक्रीटीकरण करणे | -- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १४६२ त्वर्य**

मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि. २३/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ अ मधील कै. चिंतामणराव देशमुख उर्दु शाळेचे बांधकाम करणेसाठी र.रू. ७० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) ७.आरोग्य विभाग, पान क्र. १००, अ.क्र. १३, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसुतिगृह बांधणे, शहरातील दवाखान्यांसाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसजे ६), पान क्र.२४३, अ.क्र.६८, प्रभाग क्र. ३८ अ मधील राजीव गांधीनगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह उभारणे | ५० लाख | --- |
| २) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. ११०, अ.क्र. ७, शहरामध्ये विविध ठिक्राणी सिमाभिंत बांधणे, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२५५, अ.क्र.३५९, प्रभाग क्र. ३८ अ मधील वरखडेनगर येथे सीमाभिंत बांधणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३८ अ मधील कै. चिंतामणराव देशमुख उर्दु शाळेचे बांधकाम करणे | --- | ७० लाख |

**विषय क्रमांक :- १४६३ त्वर्य**

मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता यांचे दि. २३/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२७अ मधील स.नं.४४/१/२ आणि ४४/२/२ इशा पर्ल ५१२८.१५ चौ.मी. ॲमेनिटी स्पेसमध्ये दि.१२.०४.२०१७ च्या ॲमेनिटी स्पेस कमिटीच्या बैठकीत मान्य खेळाच्या मैदानाच्या ॲमेनिटी स्पेस मध्ये क्रीडांगण विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११४, अ.क्र.७, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम, क्रीडांगणे बांधणे, मैदाने विकसित करणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. जे २४), पान क्र.२६३, अ.क्र.३०, प्रभाग क्र.२८ब मध्ये स.नं.५८५, येथील क्रीडा संकुलाचे उर्वरित काम व दुरुस्ती विषयक कामे करणे | २० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र.२७अ मधील स.नं.४४/१/२ आणि ४४/२/२ इशा पर्ल ५१२८.१५ चौ.मी. ॲमेनिटी स्पेसमध्ये दि.१२.०४.२०१७ च्या ॲमेनिटी स्पेस कमिटीच्या बैठकीत मान्य खेळाच्या मैदानाच्या ॲमेनिटी स्पेस मध्ये क्रीडांगण विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे | -- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १४६४ त्वर्य**

मा.सौ.नीता दांगट यांचे दि. २३/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.३३ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) ९.पथांची झाडलोट, कचरा व मैलापाणी वाहतुक व्यवस्था, क.पथांची झाडलोट, पान क्र. ६३, घनकचरा संदर्भात करावयाची स्वच्छता व देखभाल दुरुस्ती कामे करणे, (यादी एसआर-११), पान क्र.१५२, अ.क्र.३३, प्रभाग क्र. ३३ क धायरी परिसरात झाडण काम करणे | १० लाख | --- |
| २) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. ११०, अ.क्र. ७, शहरामध्ये विविध ठिकाणी सिमाभिंत बांधणे, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२५४, अ.क्र.३२८, प्रभाग क्र. ३३ क मधील वडगांव बु. व धायरी येथे विविध ठिकाणी बाकडे बसविणे | १० लाख | --- |
| ३) ७. आरोग्य विभाग, पान क्र. १००, अ.क्र. ६, शहरातील विविध स्मशानभूमी/दफनभूमी, दशक्रिया विधी, घाट बांधणे व विविध विकासकामे करणे (यादी क्र. एसजे १२), पान क्र.२४६, अ.क्र.७२, प्रभाग क्र. ३३ क मधील वडगांव बु. स्मशानभूमी येथे दहनशेड अत्याधुनिक करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र. ३३ क वडगांव बु. व धायरी परिसरात विद्युत विषयक कामे करणे | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र. ३३ क वडगांव बु. व धायरी परिसरात विविध ठिकाणी सुशोभिकरणाची कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १४६५ त्वर्य**

मा.श्रीमती रंजना टिळेकर, मा.उमेश गायकवाड व मा.मारुती तुपे यांचे दि. २३/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२६ ड, २१ ड, २३ क व २३ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.११ कोटी ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १३, शहरामध्ये बी.आर.टी.मार्ग विकसित करणे, (यादी क्र. ए-१६),पान क्र. २११, अ.क्र.७, CE20A1263/A16-12, सोलापूर रोड BRT मार्ग विकसित करणे. | ११ कोटी ५० लाख | --- |
| नवीन सुचावेली कामे | | |
| १) प्रभाग क्र. २६ड महंमदवाडी सर्वे नं ४६,४७,,४८,६२,६३,७१ मधील पालखी मार्ग व सर्वे नं ३८ मधील डी .पी .रस्ता विकसित करणे. | --- | २ कोटी |
| २) प्रभाग क्र. २६ ड हडपसर सर्वे नं ४३ए ,४३बी ,मधील रेल्वे लाईनच्या कडेने जाणारा डी .पी .रस्ता व रवी पार्क कडे जाणारा डी.पी .रस्ता विकसित करणे | -- | १ कोटी ५० लाख |
| ३)प्रभाग क्र. २१ ड मुंढवा सर्वे नं ८९ व ७१ या दरम्यान पुणे सोलापूर रोड रेल्वे लाईनवर एच.सी.एम.टी .रस्त्यासाठी रेल्वे रूळ ओलांडताना पूल बांधणे या कामातील पोहोच रस्त्याचे विकसन करणे. | --- | १ कोटी |
| ४) प्रभाग क्र. २३ क परिसरातील विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे | __ | १ कोटी ५० लाख |
| ५) प्रभाग क्र. २१ ड घोरपडी भारत फोर्ज शिर्के कंपनी समोरील रस्ता व फुटपाथ विकसित करणे. | — | २ कोटी ५० लाख |
| ६) प्रभाग क्र. २६ ड NIBMते ऑर्चीड पॅलेस रस्ता विकसित करणे. | ---- | १ कोटी |

| | | |
|---|---|---|
| ७) प्रभाग क्र. २३ ड नवनाथ चौक ते न्यू इंग्लिश स्कूल कॉंक्रिटीकरण करणे | — | ७५ लाख |
| ८) प्रभाग क्र. २३ ड मध्ये स.नं.२४ व २५ ग्लायडिंग सेंटरच्या बाजूचा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | — | ७५ लाख |
| ९ )प्रभाग क्र. २३ ड मध्ये तुकाई टेकडी रोड स.नं.३५ कॉंक्रिटीकरण करणे. | — | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**